# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)
(०२३५८) २८२३८७

अंक १६/२०१८ | दिनांक २३/०२/२०१८ | कालावधी ५ दिवस


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविद्या विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविद्या विभाग
९४२२३७४००१

**प्रा. विरेश चव्हाण,**
तांत्रिक अधिकारी,
कृषिविद्या विभाग
९४२२०६५३४४


| मागील हवामान सारांश दि. १९/०२/२०१८ ते २३/०२/२०१८ | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ०.० |
| पाऊस (मिमी) १/१/१८ पासून | : | ०.० |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | ३६३३.५ |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३३.०–३५.० |
| किमान तापमान (अं.से) | : | १४.५–१७.० |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ९६–९८ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ६३–७९ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | २.५–२.७ |

| हवामान पूर्वानुमान (२४/०२/२०१८ सकाळी ८:३० पासून २८/०२/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **हवामानांचे घटक** | : | **२४/०१** | **२५/०२** | **२६/०२** | **२७/०२** | **२८/०२** |
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३४ | ३४ | ३४ | ३५ | ३५ |
| किमान तापमान (अं.से) | : | २३ | २१ | २१ | २२ | २२ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ० | ० | ० | ० | ० |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ७१ | ६० | ६२ | ६५ | ५१ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ३७ | ३४ | ३९ | ३८ | ३८ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ००४ | ००८ | ००५ | ००५ | ००४ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

**:हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:**

**दिनांक २४ ते २८ फेब्रुवारी २०१८ पर्यंत अवकाश स्वच्छ सुर्यप्रकाशित राहिल. दिनांक २४ ते २८ फेब्रुवारी २०१८ पर्यंत वाऱ्याचा वेग ४ ते ८ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **कडधान्य पिके** | **वाढीची अवस्था** | • कमाल व किमान तापमानातील तफावतीमुळे वाल, चवळी, कुळीथ इ. पीकांवर मावा व पाने पोखरणारी अळी या किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच त्याच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट १५ किंवा लॅम्बडा सायहेलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| **आंबा, काजू** | **वाढीची अवस्था** | • तापमानातील होणाऱ्या बदलामुळे आंब्याची फळगळ होण्याची शक्यता आहे. फळधारणा झालेल्या आंब्याच्या झाडास १५० ते २०० लि. पाण्याच्या दोन पाळया १५ दिवसांच्या अंतराने दयाव्यात आणि झाडाच्या बुध्याभोवती अच्छादनाचा वापर करावा.<br>• आंब्याचे उत्पन्न वाढण्यासाठी व फळांची प्रत सुधारण्यासाठी फळे वाटाणा, गोटी व अंडाकृती असताना १ टक्का युरीया आणि १ टक्का पोटॅशियम नायट्रेटची तीन वेळा फवारणी करावी.<br>• आंबा बागांमध्ये तुडतुडयांचा प्रादुर्भाव दिसून येताच त्याच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५ टक्के प्रवाही ६ मिली. तसेच करपा रोगाच्या नियंत्रणासाठी थायोफिनेट मिथाईल १ ग्रॅम प्रती लिटर किंवा कार्बेनडॅझीम १ ग्रॅम प्रती लिटर किंवा प्रोपीनेब २ ग्रॅम प्रती लिटर किंवा कार्बेन्डॅझिम १२ टक्के + मॅन्कोझेब ६३ टक्के १० ग्रॅम पैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>• काजू पिकावर ढेकण्याचा (टी मॉस्किटो) प्रादुर्भाव दिसून येताच त्याच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५ टक्के प्रवाही ६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>(सदर नमुद केलेले किटकनाशक लेबलक्लेम नाही.)<br>• काजू पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच त्याच्या नियंत्रणासाठी थायोफिनेट मिथाईल १ ग्रॅम प्रती लिटर किंवा कार्बेनडॅझीम १ ग्रॅम प्रती लिटर किंवा प्रोपीनेब २ ग्रॅम प्रती लिटर किंवा कार्बेनडॅझीम १२ टक्के + मॅन्कोझेब ६३ टक्के १ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| **नारळ/ सुपारी** | –– | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी मिथील पॅरॅथिऑन २ टक्के भुकटी मिसळावी.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| **भाजीपाला आणि कलिंगड लागवड** | | • भाजीपाला (वांगी, टोमॅटो, मिरची व नवलकोल) पिकांमध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनझोल ५ मिली किंवा ८० टक्के पाण्यात मिसळणारी गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारावे.<br>• कलिंगड पिकामध्ये मर (वेली संपूर्ण सुकून जातात) या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच, कार्बेन्डॅझिम १ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात वेलीच्या बुंध्याशी ओतावे.<br>• कलिंगड वेलीच्या सभोवती सुक्या गवताचे किंवा प्लॅस्टिकचे आच्छादन करावे. |
| **दुभती जनावरे/ शेळया/ कुकुटपालन** | – | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठयाची व्यवस्था करावी.<br>• जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी झुडूपवर्गीय व बहुवर्षीय वैरणीच्या पिकांची लागवड करावी.<br>• दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण व ४ ते ५ किलो वाळलेली वैरणी द्यावी.<br>• सर्वसाधारण एका शेळीस ३–४ किलो हिरवा चारा, २ ते २.५ किलो वाळलेला चारा व ३०० ग्रॅम खुराक प्रतिदिन दयावा.<br>• ब्रॉयलर पक्षांना पहिले तीन आठवडे त्यांच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढे म्हणजेच चार–सहा आठवडयांपर्यंत ब्रॉयलर फिनीशर खाद्य द्यावे. |
| **सुचना** | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |